(सोबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी शासन राजपत्र भाग चार असाधारण क्र.९३ व ६२, दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या अध्यादेश क्र.१९ ची इंग्रजी व मराठी प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.)

**********

तात्काळ
दु.क्र./फॅ.क्र.२२८३९९२४

क्र.पंराज-२०११/प्र.क्र.९८/पंरा-२
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०११

प्रति,
१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मा.अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-३२,
६) मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) विभागीय आयुक्त, (सर्व)
८) जिल्हाधिकारी, (सर्व)
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१०) प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
११) प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
१२) प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर,
१३) प्रबंधक, जिल्हा न्यायालय, (सर्व)
१४) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१५) सर्व सह सचिव/उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१६) निवडनस्ती (पंरा-२), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

(डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष ३, अंक ३५] बुधवार, ऑक्टोबर ५, २०११/आश्विन १३, शके १९३३ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ९३

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. XIX of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. XIX of 2011), published under the authority of the Governor.].

**RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th October 2011.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XIX OF 2011.

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes hereinafter appearing;

Bom. III of 1959. Mah. V of 1962.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2011.

*(2)* It shall come into force at once.

## CHAPTER II

### AMENDMENT TO THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958

Amendment of section 14 of Bom. III of 1959.

**2.** In section 14 of the Bombay Village Panchayats Act, 1958, in sub-section *(1)*, in clause *(j-5)*,— Bom. III of 1959.

*(a)* for the existing proviso, the following proviso shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 10th January 2011, namely:—

" Provided that, no member of a *panchayat* shall be disqualified under this clause, if he submits such certificate to the Block Development Officer, within a period of one year from the 10th January 2011, being the date of commencement of the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2010:"; Mah. XXXIII of 2010.

*(b)* after the proviso, as so substituted, the following proviso shall be added, namely:—

" Provided further that, nothing contained in this clause shall affect the member holding office on the 10th January 2011, who has not submitted the certificate within a period of ninety days from the said date, as required under the provisions of this Act, as amended by the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2010; Mah. XXXIII of 2010. and he shall not be deemed to be disqualified and shall continue to hold his office for a period of one year from the said date, unless he is disqualified under any other provisions of this Act or any other law for the time being in force; or ".

## CHAPTER III

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961

Mah. V of 1962. **3.** In section 16 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, in sub-section (*1*), in clause (*p*),— Amendment of section 16 of Mah. V of 1962.

(*a*) for the existing proviso, the following proviso shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 10th January 2011, namely:—

" Provided that, no Councillor shall be disqualified under this clause, if he submits such certificate to the Chief Executive Officer, within a period of one year from the 10th January 2011, being the date of commencement of the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2010:"; Mah. XXXIII of 2010.

(*b*) after the proviso, as so substituted, the following proviso shall be added, namely:—

" Provided further that, nothing contained in this clause shall affect the Councillor holding office on the 10th January 2011, who has not submitted the certificate within a period of ninety days from the said date, as required under the provisions of this Act, as amended by the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2010; and he shall not be deemed to be disqualified and shall continue to hold his office for a period of one year from the said date, unless he is disqualified under any other provisions of this Act or any other law for the time being in force. ". Mah. XXXIII of 2010.

## CHAPTER IV

### MISCELLANEOUS

**4.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of this Ordinance by reason of anything contained therein, or in giving effect to the provisions of the Bombay Village Panchayats Act, 1958 or, the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, as the case may be, in respect of any matter contained in this Ordinance, the State Government may, as occasion arises, by order published in the *Official Gazette,* do anything which appears to it to be necessary for the purpose of removing the difficulty. Removal of difficulty. Bom. III of 1959. Mah. V of 1962.

(*2*) Every order issued under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is issued, before each House of the State Legislature.

STATEMENT

With a view to give boost to the implementation of the Central Government sponsored " *Sampoorna Swachhata Abhiyan* " through public participation and to create awareness towards cleanliness and hygiene, particularly in rural areas, the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959) and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), have been amended by the Bombay Village Panchayats and Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Second Amendment) Act, 2010 (Mah. XXXIII of 2010), so as to provide that any person who fails to submit a certificate of the concerned *panchayat* alongwith the resolution of the *Gram Sabha* certifying that he has a toilet in the house owned by him where he resides and he regularly uses it, or he has a toilet in the house not owned by him where he resides and he regularly uses it, or he has no such toilet but he regularly uses the public toilet, shall be disqualified for being chosen as a member of the Village *Panchayat* or *Panchayat Samiti* or Councillor of *Zilla Parishad*. To ensure that no existing member or Councillor is affected by the said amendment, a provision was also made to the effect that, if such member or Councillor produces such certificate within a period of ninety days from the date of commencement of Mah. Act No. XXXIII of 2010, he shall not be so disqualified. The said Mah. Act No. XXXIII of 2010 came into force on the 10th January 2011.

2. It was observed that, large number of members of the Village *Panchayats* in the State could not submit the certificate within the specified time and thus lost their membership. In view of this, the public in general and representatives of the public and of local bodies had requested the State Government to extend the said period of ninety days to one year. In this backdrop, the Government of Maharashtra considers it expedient to extend the said period of ninety days to one year and to specifically provide for the authority to whom such certificate shall be submitted by amending the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, suitably.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 5th October 2011.

K. SANKARANARAYAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHIR THAKARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI,

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २५] बुधवार, ऑक्टोबर ५, २०११/आश्विन १३, शके १९३३ [ पृष्ठे ४, किंमत रुपये २०.००

असाधारण क्रमांक ६२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९.**— मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | **पृष्ठे** १-४ |

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०११.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIX OF 2011.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९.**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ

कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याची सुधारणा**

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १४ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (ज-५) मध्ये,— १९५९ चा मुंबई ३.

(क) विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल आणि ते दिनांक १० जानेवारी २०११ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"परंतु, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १० जानेवारी २०११ पासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत जर पंचायत सदस्याने गटविकास अधिका-याला असे प्रमाणपत्र सादर केले तर, अशा पंचायत सदस्याला या खंडान्वये निरर्ह ठरविण्यात येणार नाही :"; २०१० चा महा. ३३.

(ख) अशा प्रकारे दाखल केलेल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, दिनांक १० जानेवारी २०११ पासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत ज्या सदस्याने सदर प्रमाणपत्र सादर केले नसेल अशा, उक्त दिनांकास विद्यमान सदस्यावर या खंडातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही; आणि अशा सदस्याला या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये निरर्ह ठरविले नसेल तर, तो निरर्ह ठरविण्यात आला असल्याचे मानण्यात येणार नाही आणि त्याला उक्त दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीपर्यंत आपले पद धारण करण्याचे चालू ठेवता येईल ; किंवा". २०१० चा महा. ३३.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा

१९६२ चा महा ५. **३.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (त) मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

(क) विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल आणि ते दिनांक १० जानेवारी २०११ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

२०१० चा महा. ३३. "परंतु, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १० जानेवारी २०११ पासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत जर परिषद सदस्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला असे प्रमाणपत्र सादर केले तर, अशा परिषद सदस्याला या खंडान्वये निरर्ह ठरविण्यात येणार नाही :";

(ख) अशा प्रकारे दाखल केलेल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

२०१० चा महा. ३३. "परंतु आणखी असे की, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, दिनांक १० जानेवारी २०११ पासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत ज्या परिषद सदस्याने सदर प्रमाणपत्र सादर केले नसेल अशा, उक्त दिनांकास विद्यमान परिषद सदस्यावर या खंडातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही; आणि अशा सदस्याला या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये निरर्ह ठरविले नसेल तर, तो निरर्ह ठरविण्यात आला असल्याचे मानण्यात येणार नाही आणि त्याला उक्त दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीपर्यंत आपले पद धारण करण्याचे चालू ठेवता येईल.".

प्रकरण चार

## संकीर्ण

**४.** (१) या अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात आणताना, त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात, किंवा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करणे.

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध केलेला प्रत्येक आदेश, तो प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## निवेदन.

लोक सहभागातून, केंद्र सरकार पुरस्कृत " **संपूर्ण स्वच्छता अभियान** " राबविण्यास चालना देण्याच्या आणि विशेष करून, ग्रामीण भागात स्वच्छता व आरोग्य याबाबत जागृती निर्माण करण्याच्या हेतूने, जी व्यक्ती आपल्या मालकीच्या घरात राहत असून त्या घरामध्ये शौचालय आहे व ती त्याचा नियमितपणे वापर करीत आहे, किंवा ती जेथे राहते ते घर तिच्या मालकीचे नसून त्या घरामध्ये शौचालय आहे व ती त्याचा नियमितपणे वापर करीत आहे, किंवा तिच्या अशा घरामध्ये शौचालय नाही मात्र, ती नियमितपणे सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहे, असे प्रमाणित करणा-या ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती, ग्रामपंचायतीचा किंवा पंचायत समितीचा सदस्य किंवा जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरेल, अशी तरतूद करता यावी म्हणून, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) यांमध्ये, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० (२०१० चा महा. ३३) याद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. सदर सुधारणेमुळे कोणत्याही विद्यमान सदस्याला किंवा परिषद सदस्याला बाधा पोहोचणार नाही याची खातरजमा करण्यासाठी, जर अशा सदस्याने किंवा परिषद सदस्याने, सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत असे प्रमाणपत्र सादर केले तर, असा कोणताही सदस्य किंवा परिषद सदस्य अशा प्रकारे निरर्ह ठरणार नाही, अशा आशयाची देखील तरतूद करण्यात आली होती. सन २०१० चा उक्त महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ हा, दिनांक १० जानेवारी २०११ रोजी अंमलात आला आहे.

२. राज्यातील अनेक ग्रामपंचायत सदस्य विनिर्दिष्ट मुदतीच्या आत प्रमाणपत्र सादर करू न शकल्यामुळे त्यांना आपले सदस्यत्व गमवावे लागले, असे निदर्शनास आले होते. हे लक्षात घेऊन, उक्त नव्वद दिवसांचा कालावधी वाढवून तो एक वर्ष इतका करण्यासाठी सर्वसामान्य जनता आणि लोकप्रतिनिधी व स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी यानी राज्य शासनाला विनंती केली होती. ती विनंती विचारात घेऊन, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये योग्य त्या सुधारणा करून, त्याद्वारे उक्त नव्वद दिवसांचा कालावधी वाढवून तो एक वर्ष इतका करणे आणि असे प्रमाणपत्र कोणत्या प्राधिका-याला सादर करण्यात येईल त्या बद्दलची विनिर्दिष्ट तरतूद करणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई
दिनांक ५ ऑक्टोबर २०११.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधीर ठाकरे,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.